काव्य वाचन स्पर्धा

आज दि. १३ ऑगस्ट रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची जयंती व नुकतीच ११ ऑगस्ट ला बालकवी जयंती निमित्त महाविद्यालयात मराठी विभागाअंतर्गत काव्य वाचन स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेचे उद्घाटन माननीय प्राचार्य व्ही. आर. पाटील यांनी केले या प्रसंगी अध्यक्षीय भाषणातुन त्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी व बालकवी यांच्या काव्यकर्तुत्वाचा गौरव केला तसेच या स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी व उपस्थित विद्यार्थ्यांनी बालकवी व बहिणाबाई आदर्श डोळ्यासमोर ठेवावा आणि साहित्यकृती अंगीकारावी अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. पी. पाटील यांनी सुद्धा विद्ध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. छाया खर्चे यांनी केले त्यात स्पर्धेचे स्वरूप व महत्व विशद केले. प्रा . डॉ. डी. एन. बावस्कर यांनी स्पर्धेचे नियम सांगितले. या स्पर्धेत महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी सहभागी झाले होते. यात प्रथम क्रमांकाचे बक्षिस सचिन धुंदले (एस. वाय. बी. ए.) व्दितीय क्रमांकाचे बक्षिस कु. कांचन मुलांडे (एस.वाय.बी.एसी.) तृतीय क्रमांकाचे बक्षिस कु. मयुरी चिमकर (एफ.वाय. बी. ए.) या विद्यार्थ्यांनी मिळविले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणुन महाविद्यालयातील प्रा. पी. पी. चौधरी , प्रा. डॉ. के. एन. गायकवाड , प्रा. डी. आर. कोळी यांनी पाहिले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अश्विन भालेराव व केतन शिरतुरे यांनी केले. या प्रसंगी बहुसंख्य प्राध्यापक वृंद व विध्यार्थी उपस्थित होते.





